निशाणी क्र.६१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.६ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – शिवाजी शिवदास अकोलकर,

वय – ६५ वर्षे, व्यवसाय–सेवानिवृत्त,

राहणार – वांबोरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.एच. चव्हाण यांचे मार्फत सुरुः–**

दिनांक २८/०६/२०१३ रोजी मी सोनई पोलिस ठाणे येथे पो.हे.कॉ. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी ठाणे अंमलदार पो.ना. भाबड यांनी गु.र. नंबर ११०/२०१३ हा भा.द.वी. कलम ३२४, ३२३ अन्वये दाखल करुन घेतला होता. त्याचा तपास वरिष्ठांच्या लेखी आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. आता मला तो आदेश दाखवण्यात आला. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. मी ठाणे अंमलदार यांच्यासोबत काम केलेले असल्याने त्यांची सही ओळखतो. तपासी आदेशास **निशाणी ६२** देण्यात येते.

२. तपासासाठी मला जबाब, दैनिक अहवाल व रिपोर्ट प्राप्त झाला. मी कागदपत्रांचे अवलोकन केले. घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला निशाणी ५८ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. साक्षीदारांचे जबाब घेतले. गुन्हयात वापरलेली एक कु–हाड व अडीच फुट लांबीचे लोखंडी गजाचे दोन तुकडे आरोपींनी पोलिस ठाण्यात आणुन दिले. ते जप्त करुन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा केला. आता मला तो जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ६३** देण्यात येते. जप्त हत्यार पोलिस ठाण्यात मुद्देमाल कक्षात जमा केले. त्याची पावती प्राप्त केली. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन कागदपत्रात सामील केले. आरोपींना अटक करुन

न्यायालयासमक्ष हजर केले. आरोपींविरुध्द पुरावा गोळा झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आजरोजी दोन आरोपी न्यायालयात हजर आहे. (आरोपी क्र.१ मयत आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र. तर्फे ॲड. श्रीमती व्ही. एन.जोशी यांचेमार्फत सुरु–**

३. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत गुन्हयात फिर्यादी किंवा जखमीचे एक्सरे रिपोर्ट नाहीत. हे मला सांगता येणार नाही की, फिर्यादी व जखमी यांचे एक्सरे काढलेले नसल्यामुळे ते गुन्हयात दाखल नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व जखमीचे कपडे जप्त नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा पोलिस ठाण्यात केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कधीही पोलिस ठाण्यात हत्यार जमा केले नाही. तपासादरम्यान मी सिव्हील हॉस्पीटल येथे फिर्यादीशी संबंधीत कागदपत्रांबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कागदपत्रांमध्ये सिव्हील हॉस्पीटलचे फिर्यादीने उपचार घेतल्याबाबत वैदयकीय प्रमाणपत्र दाखल नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कधीही फिर्यादीला व त्याच्या पत्नीला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.२ रुक्मिणी हिने जबाब देतेवेळी ''मी, माझे पती आणि मुले ऊसाचे शेत तयार करण्यासाठी गेलो होतो, सायंकाळी आम्ही काम आवरुन घरी परत येण्याच्या तयारीत होतो, आरोपी क्र.२ ने माझे केस ओढून बाजुला केले त्यामुळे माझ्या डोक्यात वेदना झाल्याने मी खाली बसले, आरोपी क्र.२ हा कु–हाडीच्या तुंब्याने पाठीवर मारहाण करत होता इत्यादी मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता.'' हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.२ रुक्मिणी हिच्या जबाबात, जनार्धन काळे व

अर्जुन काळे हे दोघेजण आरोपींना म्हणाले की, या माणसाच्या तोंडातून फेस येत आहे जीव घेता काय, या माणसाचा'' हा मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता.

५. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.३ आदिनाथ याने, आरोपी क्र.१ ते ३ सायंकाळी ०५.४५ मिनीटांनी शेतामध्ये आले हा मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.३ आदिनाथ याने, आरोपी क्र.२ ने माझ्या आईचे केस ओढले, माझ्या आईला त्रास होत असल्यामुळे ती खाली बसली इत्यादी मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.३ आदिनाथ याने, माझे चुलते दत्तात्रय यांनी माझ्या आईला दवाखान्यात नेले हा मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.३ आदिनाथ याने, ''मी भांडण सोडवण्यासाठी गेलो होता'' हा मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता.

६. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र.४ जनार्धन याने, ''फिर्यादीला मी बैलगाडीतून झापवाडी–पानसवाडी रस्त्यापर्यंत नेले होते'' हा मजकुर जबाब देतेवेळी सांगितला नव्हता. हे मला सांगता येणार नाही की, फिर्यादी मोटारसायकलवरुन पडल्याने त्याला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/–

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–०१/१०/२०२४.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा